# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः14.05.2024** **वारःमंगळवार**

---

1. लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात देशभरात सरासरी 67 पूर्णांक 25 टक्के मतदान
2. सातव्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस, उर्वरीत टप्प्यासाठी प्रमुख नेत्यांचा प्रचाराचा धडाका
3. मुंबई उपनगरांत जाहिरातफलक कोसळल्यानं झालेल्या दुर्घटनेत 14 जणांचा मृत्यू
4. बिहारचे माजी उपमुख्यमंत्री आणि वरिष्ठ भाजपा नेता सुशीलकुमार मोदी यांचं निधन आणि
5. राष्ट्रीय महासंघ करंडक मैदानी स्पर्धेत महाराष्ट्राच्या आभा कथुआ हिचा गोळाफेकीत नवा राष्ट्रीय विक्रम.

**टक्केवारी**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातील मतदान काल देशभरात शांततेत आणि उत्साहात पार पडलं. 9 राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशांतल्या 96 जागांसाठी सरासरी 67 पुर्णांक 25 टक्के मतदान झालं. आंध्रप्रदेशमध्ये साडे 76 टक्के, बिहार 57 टक्के, तेलंगण 64 पुर्णांक 74, जम्मू-काश्मीर 37 पुर्णांक 98, झारखंडमध्ये एकंदर 65 आणि मध्य प्रदेशात 8 जागांसाठी 70 पुर्णांक 98 टक्के मतदान झालं. ओडिशामध्ये 73 पुर्णांक 97 टक्के, उत्तर प्रदेशच्या 13 जागांसाठी एकंदर 58 टक्के आणि पश्चिम बंगालमध्ये 8 जागांसाठी 78 पुर्णांक 37 टक्के मतदान झाले. झारखंड आणि ओडिशाच्या प्रत्येकी चार जागा आणि केंद्रशासित प्रदेश जम्मू-काश्मीरच्या एका जागेसाठी मतदान झाले. चौथ्या टप्प्यासाठी एकूण एक हजार 717 उमेदवार रिंगणात होते. चौथ्या टप्प्यातील मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आतापर्यंत 23 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील एकंदर 379 लोकसभा क्षेत्रातील मतदारसंघांमध्ये मतदान पूर्ण झालं आहे. अरुणाचल प्रदेश, सिक्कीम, आंध्र प्रदेश आणि ओडिशा इथं 28 विधानसभा जागांसाठी सार्वत्रिक निवडणुकांमध्ये मतदान पूर्ण झालं आहे. महाराष्ट्रात पुणे जिल्ह्यातील पुणे शहर, शिरुर, आणि मावळसह, अहमदनगर, शिर्डी, नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, औरंगाबाद आणि बीड या 11 जागांसाठी 59 पुर्णांक 64 टक्के मतदान झालं.

**उमेदवारी अर्ज**

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या म्हणजेच शेवटच्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज अखेरचा दिवस आहे. या शेवटच्या टप्प्यात 7 राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून ५७ जागांसाठी मतदान होणार आहे. यामध्ये उत्तर प्रदेश आणि पंजाबमधल्या प्रत्येकी 13, पश्चिम बंगालमधल्या 9, बिहारमधल्या 8, ओडीसातल्या 6, हिमाचल प्रदेशातल्या 4, झारखंडमध्ये 3 आणि चंदीगडमधल्या एका लोकसभा मतदारसंघात १ जून रोजी मतदान होणार आहे. उद्या उमेदवारी अर्जांची छाननी होणार असून येत्या शुक्रवारपर्यंत अर्ज मागं घेण्यासाठी मुदत आहे.

**प्रचराला वेग**

लोकसभा निवडणूकीच्या उर्वरीत टप्प्यासाठीच्या प्रचाराला वेग आला आहे. विविध राजकीय पक्षांचे नेते आपापल्या मतदार संघात प्रचारसभा आणि रोड शो करत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल वाराणसीत रोड शो केला. यावेळी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येनं उपस्थित होते. तत्पुर्वी पंतप्रधानांनी बिहारमधील हाजीपूर, मुझफ्फरपूर आणि सारण इथं प्रचारसभेला संबोधित केलं. त्यांनी राज्यातील जनतेला देशाच्या विकासासाठी मतदान करण्याचे आवाहन केले. पंतप्रधान आज वाराणसी लोकसभा मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनी उत्तर प्रदेशातील रायबरेली इथं जाहीर सभेला संबोधित केलं. केंद्रात काँग्रेस आणि सहकारी पक्षाची सत्ता आल्यास गरीब शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याला प्राधान्य देऊ असं आश्वासन त्यांनी यावेळी दिलं. काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी वाड्रा यांनी अमेठी इथं जाहीर सभा घेतली.

**<u>अमित शहा-पालघर, धुळे</u>**

केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपाचे वरिष्ठ नेते अमित शाह यांनी काल महाराष्ट्रात पालघर जिल्ह्यातल्या वसईमध्ये तसंच धुळ्यात महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी जाहीर सभा घेतली.

**<u>सीतारामन</u>**

कोविडच्या काळात मदतकार्यासाठी बराच निधी वापरावा लागूनसुद्धा भाजपाच्या नेतृत्वातल्या केंद्र सरकारनं वित्तीय व्यवस्थापन अत्यंत चांगल्या प्रकारे केल्याचं भाजपाच्या वरीष्ठ नेत्या आणि वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. काँग्रेसनं आपल्या जाहीरनाम्यात दिलेल्या अवास्तव आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी काय योजना केली आहे, असा सवाल त्यांनी समाजमाध्यमावरील संदेशात उपस्थित केला आहे. आपल्या प्रस्तावित योजनांसाठी किती निधी लागेल याचं गणित काँग्रेसनं मांडलं आहे का, असं विचारुन कर न वाढवता, कर्ज न घेता आणि अर्थव्यवस्थेची गती न रोखता या योजना कशा राबवणार ते काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी स्पष्ट करावं, असं सीतारामन यांनी सुचवलं आहे.

**<u>चेन्निथला</u>**

देशभरात इंडीया आघाडी आणि महाविकास आघाडीसाठी पोषक वातावरण आहे, असं अखिल भारतीय काँग्रेस समिती महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्निथला यांनी काल मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितल. येत्या 17 मे रोजी इंडिया आघाडीचे नेते वांद्रे कुर्ला संकुलात संयुक्त प्रचार सभा घेणार आहेत, असं त्यांनी सांगितलं.

**<u>रथ-यात्रा</u>**

केंद्रिय मंत्री आणि ज्येष्ठ भाजपा नेते पियुष गोयल यांनी काल उत्तर मुंबई परिसरांत रथयात्रेचं आयोजन केलं होतं. भाजपाचे राम नाईक, युवा नेते तेजस्वी सुर्या, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यावेळी उपस्थित होते.

**<u>घाटकोपर-पाऊस-मुख्यमंत्री</u>**

मुंबईसह उपनगरात काल दुपारनंतर सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडला. यावेळी घाटकोपरमधल्या छेडानगर भागात एका पेट्रोल पंपावर आणि आजूबाजूच्या घरांवर 100 फूट उंच जाहिरात फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेत 14 जणांचा मृत्यू झाला तर 43 जण जखमी झाले. अग्निशमन दलानं अनेकांना सुरक्षित बाहेर काढलं असून बचाव कार्य अजूनही सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. तसंच या दुर्घटनेला जबाबदार असणाऱ्यांविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुंबईतल्या अशा सर्व जाहिरात फलकांचं ऑडीट करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या असून अनधिकृत फलकांवर कारवाई करण्यात येणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. या दुर्घटनेच्या उच्चस्तरीय चौकशीचे आदेश राज्याचे गृहमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी दिले आहेत. दरम्यान, या पावसामुळं काल मुंबईतली विमान, रस्ते, उपनगरीय रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली होती. रायगड, ठाणे आणि नवी मुंबईतही काल संध्याकाळी जोरदार वा-यासह अवकाळी पाऊस झाला.

**इंडोनेशिया**

इंडोनेशियातील सुमात्रा बेटावर आलेल्या पूर आणि ज्वालामुखीतून बाहेर आलेला थंड लाव्हा रसामुळे किमान 41 जणांचा मृत्यू झाला आहे. शनिवारी झालेल्या मुसळधार पावसानं सुमात्रामधील सर्वात सक्रिय ज्वालामुखी असलेल्या मारापी पर्वतावर राख आणि खडकांचा प्रवाह वाहून आला. याबरोबर मोठ्या प्रमाणात वाहून आलेल्या चिखलामुळे या भागातील दोन जिल्हे

जलमय झाले असून 100 हून अधिक घरं, मशिदी आणि इतर मालमत्तेचं नुकसान झाले आहे. 17 नागरिक अद्याप बेपत्ता आहेत. आगम आणि तनाह दातार जिल्ह्यात सर्वाधिक नूकसान झालं आहे.

**CBSE**

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेचा निकाल काल जाहीर झाला. बारावीच्या परीक्षेत 87 पूर्णांक 98 शतांश टक्के तर दहावीच्या परीक्षेत 93 पूर्णांक 60 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

**NTA**

राष्ट्रीय चाचणी संस्था अर्थात NTA च्या वतीनं विद्यापीठस्तरावरील पदवीपूर्व प्रवेश परिक्षा देशभरातील विविध केंद्रांवर उद्यापासून 18 मेपर्यंत आयोजित करण्यात आली आहे. देशांतर्गत 379 केंद्र तर विदेशातील 26 शहरांमध्ये या परिक्षा घेतल्या जात आहेत. परिक्षार्थी या परिक्षेसाठीची प्रवेशपत्र cuet-ugl@nta.ac.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करु शकतात असं NTA नं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**करदाते**

करदाते आता आपल्या वार्षिक अर्थव्यवहार तपशीलाच्या म्हणजेच एआयएस च्या पडताळणी प्रक्रियेचं सद्यस्थितीतील काम जाणून घेऊ शकणार आहेत. यामध्ये करदात्यांच्या करपात्र आर्थिक व्यवहारांची सविस्तर नोंद असते आणि त्यावर करदात्यांनी दिलेलं उत्तर स्वीकारलं जातं. नव्या कार्यपद्धतीनुसार करदात्यांनी दिलेलं उत्तर प्राप्तीकर विभागानं स्वीकारलं आहे, अंशतः स्वीकारलं आहे की फेटाळलं आहे हेदेखील करदात्यांना पाहता येणार आहे, अशी माहिती काल प्राप्तीकर विभागानं दिली. यामुळे तक्रार निवारण सोपं होईल, करदात्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधेत सुधारणा होईल आणि पारदर्शकता वाढेल, असं विभागानं म्हटलं आहे.

**निधन-सुशीलकुमार मोदी**

बिहारचे माजी उपमुख्यमंत्री आणि वरिष्ठ भाजपा नेता सुशीलकुमार मोदी यांचं काल नवी दिल्ली इथं निधन झालं. राष्ट्रपती द्रौपदी मुरमू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड तसंच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह वरिष्ठ भाजपा नेत्यांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. बिहारमध्ये भाजपाला यश मिळवून देण्यात सुशिल मोदी यांचं मोलाचं योगदान होतं. सुशील मोदी यांची राजकारणाशी संबंधित विषयांची समज सखोल होती. प्रशासक म्हणूनही त्यांनी प्रशंसनीय काम केलं आहे आणि जीएसटीसंदर्भातील त्यांची सक्रिय भूमिका कायम स्मरणात राहील, अशा शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना श्रध्दांजली वाहिली आहे. बिहारनं एक महान राजकीय नेता कायमचा गमावला असल्याचं ज्येष्ठ भाजपा नेते अमित शहा यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे. सुशील मोदी यांचे संपूर्ण आयुष्य बिहारला समर्पित होतं आणि राज्याला विकासाच्या मार्गावर नेण्यासाठी त्यांचे प्रयत्न महत्वाचे ठरले आहेत. सुशीलकुमार मोदी यांच्या जाण्यानं कार्यकर्त्यांसाठी कधीही भरून न येणारी हानी झाली आहे, अशी भावना भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी व्यक्त केली आहे

**गोळाफेक**

भुवनेश्वर इथं झालेल्या राष्ट्रीय महासंघ करंडक मैदानी स्पर्धेत महाराष्ट्राच्या चमूतल्या आभा कथुआ हिनं गोळाफेकीत नव्या राष्ट्रीय विक्रमाची नोंद केली. तिनं आपल्या आधीच्या विक्रमाला मागे टाकत 18 पूर्णांक 41 शतांश मीटर गोळाफेक करुन या स्पर्धेत सुवर्णपदक पटकावलं.मात्र ऑलिम्पिक स्पर्धेत सहभागासाठी आवश्यक असलेला 18 पूर्णांक 80 शतांश मीटरचा पल्ला गाठण्यात तिला अपयश आलं. आतापर्यंत कुठल्याही भारतीय महिला गोळाफेकपटूला हा टप्पा गाठता आलेला नाही.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**